महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

जा.क्र/जिवानिशा/वाहतूक अधिसुचना/४९३/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - ३१/१०/२०२६

अधिसूचना

दि.०१/११/२०२६ रोजी सकाळी ०७.०० ते १८.०० वाजेपर्यंत खंडाळा पोलीस ठाणे हद्दीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळा येथे जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूक २०२६ अनुषंगाने मतदान केंद्र असून सदर ठिकाणी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणूक मतदान प्रक्रिये दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने खंडाळा शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते मच्छी मार्केट रस्ता वाहतुकीकरीता बंद करुन पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये खंडाळा शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते मच्छी मार्केट या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतूक सुरळीत राहणेकरीता दि.०१/११/२०२६ चे ०७.०० ते १८.०० वा. पर्यतची खालील अधिसूचना पारित करीत आहे.

वाहतूक मार्गातील बदलाबाबत

वाहतूक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा खंडाळा ते मच्छी मार्केट खंडाळा (डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौक - दत्त मंदिर बावडा फाटा चौक - मच्छी मार्केट खंडाळा) वाहतुकी करीता बंद करण्यात येत आहे.

२. पर्यायी मार्ग म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा - छत्रपती शिवाजी महाराज चौक – छत्रपती संभाजी महाराज चौक - रेस्ट हाऊस - एस.टी.स्टँड खंडाळा येथून मच्छी मार्केट या मार्गाचा वापर करावा.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे, त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसूचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक ३१/१०/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा
सत्यमेव जयते

(निखील पिंगळे) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, सातारा

ठिकाण - सातारा

दिनांक - ३१/१०/२०२६

Scanned with OKEN Scanner

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे

२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) मुख्य अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग सातारा

५) मुख्यधिकारी पाटण नगर परिषद पाटण

६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

प्रत माहीतीसाठी सादर

१) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

२) मा.जिल्हाधिकारी सातारा.

Scanned with OKEN Scanner